


आपलं घर आपलं जग असतं
खरंच ते नंदनवन असतं
आपला आतला आनंद आपल्याला
इथेच गवसतो.
मनाचा गाभारा आनंदाने
भरून जातो.
फुलांच्या रंगगंधाने घराचा परिसर
सुगंधमय होतो
पक्षांच्या कुजनाने स्वर्गीय सुरांचा
अनुभव येतो.
उत्साहाचं कारंज इथे कायम
बरसत असतं
घरातलं वातावरण समाधानाने
तृप्त असतं
देवघरातील समईची ज्योत मंद
तेवत असते.
मनःशांतीची प्रचिती इथेच
तर येते.

सौ. प्रिती लकडे

